# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र जिल्हा District: मुंबई पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No.: 30 वर्ष Year: 2026 दिनांक Date: 06/10/2026

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act .................................... कलमे Sections ....................................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ....................................

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ............... तारीख पासून Date from: 29/09/2026 वेळ Time ............... ते तारीख पर्यंत Date to: आजपर्यंत वेळ Time ...............

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 29/09/2026 वेळ Time: 14:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 03/26 तारीख Date: 06/10/2026 वेळ Time: 8.15 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी लेखी / तोंडी Written / Oral ....................................

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: उत्तर 31 km चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ....................................

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: बोरिवली पोलीस ठाणे, एस.व्ही.रोड, बोरिवली (प) मुंबई. ठिकाणाचे नंबर No. if any ............... गल्ली Ward ............... रस्त्याचे नाव Name of road ...............

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............... गाव Village ............... पोस्ट Post ............... तालुका Taluka ............... जिल्हा Dist. ............... राज्य State ...............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............... तालुका Taluka ............... जिल्हा Dist. ............... राज्य State ...............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. विठ्ठल पिसाळ (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: जगन्नाथ पिसाळ

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 37 (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 7021324792

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............... दिल्याचा दिनांक Date of issue ............... दिल्याचे ठिकाण Place of Issue ............... (f) व्यवसाय Occupation: नोकरी

(g) धर्म Religion: हिंदू जात Caste ............... जनजात Sub-Caste ...............

(h) पत्ता Address ............... गल्ली/सर्व्हे नं. Ward ............... घर/नाव नं. House Name No. ............... फोन/मो. नं. Phone No. ............... पॅन नं. Pan No. ............... वोटर्स नं. Card No. ...............

201/H, साई संसार कॉम्प्लेक्स, सेक्टर 5, नवीन पनवेल 410206

रस्त्याचे नाव Road ............... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............... गाव Village ............... पोस्ट Post ............... पो. स्टे. P. Stn. ...............

तालुका Taluka ............... जिल्हा Dist. ............... राज्य State ............... सध्याचा पत्ता Present Address ...............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

ज्ञानेश्वर मोहन परांडे वय - 31, व्यवसाय - नोकरी (पोलीस उपनिरीक्षक)
नेमणूक - बोरिवली पो. ठाणे
पत्ता - B-1/18, बोरिवली पोलीस अधिकारी वसाहत, एस.व्ही.रोड, बोरिवली (प) मुं.92

P.) K 1043 (A) (1000–1-2025)

यातील फिर्यादी श्री. विठ्ठल जगन्नाथ पिसाळ वय. 34 वर्ष यांचा स्वतंत्र पानावर घेतलेला दि. 06/01/2026 रोजीचा जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबर अहवाल संबोधण्यात येत आहे

समक्ष

[signature] [signature]

(अमोल आंबवणे)
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि, मुंबई.

फिर्याद

दिनांक ०६/१०/२०२६

मी, विठ्ठल जगन्नाथ पिसाळ, वय ३७ वर्षे, व्यवसाय – नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणूक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ७०२१३२४७९२

———————

मी वरील प्रमाणे असून, दिनांक ०६/०८/२०२६ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी मंगळवार, दिनांक २९/०९/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचा पडताळणी क्रमांक ६८/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता सापळा अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून सहायक पोलीस आयुक्त, प्रविण नावडकर यांची नेमणूक केल्याबाबत आदेश मिळाला. नमुद पडताळणीमधील तक्रारदार श्री अश्वीन जगजीवनदास शाह यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, ते जय अंबे माता मंदिर, प्लॉट नं. ३९/२३०, सेक्टर ६, चारकोप, मुंबई या ठिकाणी असलेल्या मंदिराचे पुजारी आहेत. तक्रारदार आणि त्यांचा पुतन्या श्री तेजस शाह यांच्यामध्ये मुंबई व गुजरात येथे वडिलोपार्जीत जमीनीबाबत वाद चालू असुन सदरचे प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. तक्रारदार, त्यांची बहीण श्रीमती सीमा दोशी व श्रीमती गिरा डगली यांचेविरुध्द श्री तेजस शाह यांने बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार अर्ज केला होता. सदर तक्रार अर्जाची चौकशी पोलीस अधिकारी श्री घोडके यांनी केली. त्यावेळी त्यांनी लिखीत जबाब डिस्पॅचमध्ये दिला आहे. त्यावर तक्रारदार, त्यांची बहीण श्रीमती सीमा दोषी व श्रीमती गिरा डगली यांचेविरुध्द श्री तेजस शाह याने बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ११८४/२०२६ कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०, ६२, ३(५) भारतीय न्याय संहीता २०२३ अन्वये दिनांक ०८/०९/२०२६ रोजी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयाचे तपासी अधिकारी श्री ज्ञानेश्वर परांडे यांनी तक्रारदार यांना व त्यांच्या बहीणींना कलम ३५(३) भारतीय नागरीक संहीता २०२३ अन्वये नोटीस देवुन हजर राहण्याबाबत कळविले होते. त्यावर तक्रारदार हे त्यांची मुलगी तृप्ती हिचेसह दिनांक २८/०९/२०२६ रोजी बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई येथे जावुन तळमजल्यावरील रुम नंबर १० मध्ये जावुन पोलीस उप निरीक्षक श्री. परांडे यांना भेटले. त्यावेळी श्री परांडे यांनी तक्रारदार यांना ''तुमच्या विरुध्द वरीलप्रमाणे गुन्हा दाखल असुन, तुम्हाला १० वर्षाची अटक होईल. अटक न करण्यासाठी, गुन्हयात वाचविण्यासाठी व गुन्हयातून बाहेर काढण्यासाठी रूपये १,५०,०००/– दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना दोन दिवसांत विचार करुन सांगतो असे सांगितले. सदरवेळी श्री परांडे यांनी तक्रारदार यांना ''आता दोन दिवसासाठी सोडतो व पैश्याची व्यवस्था झाल्यावर पैसे हे शब्द न वापरता त्याऐवजी डॉक्युमेन्ट/ स्टेटमेन्ट तयार आहे असे मला फोनवर सांगा म्हणजे मी तुम्हाला कोठे भेटायचे हे सांगतो'' असे सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे, पद – पोलीस उप निरीक्षक, नेमणूक – बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांना रूपये १,५०,०००/– इतक्या लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, तक्रारदार यांनी दिनांक २९/०९/२०२६ रोजी लाप्रवि. मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री रोहीत भीमा थोरवे, वय २८ वर्षे, पद – राज्यकर निरीक्षक, नेमणूक – राज्यकर सह आयुक्त, नोडल १२ यांचे कार्यालय, तुर्भे, नवी मुंबई २) श्री अभिजीत भास्कर आकाडे, वय ३४ वर्षे, पद – राज्यकर निरीक्षक, नेमणूक – नोडल १२ व लेखापरिक्षण ४, तुर्भे, नवी मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ प्रविण नावडकर, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दिनांक २९/०९/२०२६ रोजी सर्वप्रथम लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामधून पंचासमक्ष तक्रारदार श्री अश्वीन शाह यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९८२०२०२२२७ वरून लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे, यांचे मोबाईल क्रमांक ७४२०८००३०१ वर १८.५३

**श्री विठ्ठल पिसाळ, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. मुंबई यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु...**

वा. फोन केला असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही. म्हणून दिनांक ३०/०९/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंच क्र. ०१ श्री रोहीत थोरवे यांचे सोबत लोकसेवक यांचे कार्यालयात पाठवून त्यांचे तक्रारीची पडताळणी करणार असल्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक ३०/०९/२०२६ रोजी १०.३० वा. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाप्रवि, मुंबई कार्यालयात ठरल्याप्रमाणे हजर राहीले. त्यानंतर मी, सपोआ नावडकर, तक्रारदार, त्यांची मुलगी तृप्ती, दोन पंच व पथक असे कारवाईकरीता खाजगी वाहनाने रवाना झालो. बोरीवली (प) येथील मोक्ष प्लाझा शॉपिंग सेंन्टरच्या पार्कींगमध्ये पोह. रावराणे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दिनांक २९/०९/२०२६ रोजीच्या कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन प्रथम माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य खाजगी वाहनामध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर मी १४.०५ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या भगव्या रंगाच्या सदऱ्याच्या आतील बाजूस असलेल्या बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावून पंच नंबर ०१ श्री रोहीत थोरवे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी ऑटो रिक्षाने लोकसेवक यांचे कार्यालय असलेले बोरीवली पोलीस ठाणे येथे पाठविले. सदर प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे यांनी तक्रारदार यांचे सोबत असलेले पंच श्री रोहीत थोरवे यांना रूमच्या बाहेर थांबविले.

त्यानंतर लोकसेवकाने तक्रारदारास **''एकेकाच करा मग तेवढं, एकेकाच''** असे बोलले. तेव्हा तक्रारदाराने लोकसेवकास **''क्या ?, तीनाचे एक लाख''** असे विचारले असता, लोकसेवकाने **''एकाचे''** असे सांगितले. त्यावर तक्रारदार हे **''एकाचे पन्नास म्हणजे तिघेचे दिड लाख रूपया, थोडा काही, एक लाख तर तुम्ही सांगितल होता''** असे बोलले. त्यानंतर तक्रारदाराने लोकसेवकास काही रक्कम कमी करण्यास सांगितली असता, लोकसेवकाने तक्रारदारास **''वीस कमी करा''** असे सांगितले. त्यावर तक्रारदाराने **''कितीमधी, एक लाखामधी ?''** असे विचारले असता लोकसेवकाने तक्रारदारास **''एक, एक तीस करा''** असे सांगितले. अशाप्रकारे लोकसेवकाने तक्रारदारास प्रत्येक आरोपीचे ५०,०००/– रूपये लागतील असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी कमी करा असे सांगीतले असता, त्यांनी कमी २०,०००/– होतील असे सांगुन तडजोडी अंती रूपये १,३०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व लोकसेवकाने मागणी केलेली लाचेची रक्कम तीन तारखेला, तीन चार दिवसांनी, मी अचानक तीन दिवसात फोन करून कळवेल, कॉल केल्याशिवाय यायच नाय, असे तक्रारदारास सांगितले. अशाप्रकारे दिनांक ३०/०९/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती रूपये १,३०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली. वर नमुद भेटी दरम्यान लोकसेवक व तक्रारदार यांचेमधील झालेले बोलणे हे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे ध्वनी मुद्रीत करण्यात आले आहे व त्याबाबत दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.

दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवकाने तक्रारदार यांना तीन तारखेला, तीन चार दिवसांनी, मी अचानक तीन दिवसात फोन करून कळविल, कॉल केल्याशिवाय यायच नाय असे सांगितल्याने मी तक्रारदार यांना समोरून लोकसेवकाने संपर्क केल्यास त्याबाबत तात्काळ मला कळविण्यास सांगितले व लोकसेवकाने भेटण्याकरीता बोलाविल्यानंतर त्यांना मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याकरीता तक्रारदार यांना पाठवून त्यावेळी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक ०५/१०/२०२६ रोजी मी लाप्रवि कार्यालयात हजर असताना तक्रारदार यांनी मला फोन करून सांगितले कि, लोकसेवकाने त्यांना कॉल करून आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सायंकाळी ४ ते ५ वा. चे दरम्यान भेटण्याकरीता बोरीवली पोलीस ठाणे येथे बोलाविले आहे. त्यावर मी तक्रारदार यांना तात्काळ

समक्ष,

(अमोल आंबवणे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

लाप्रवि. मुंबई कार्यालयात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे लाप्रवि. मुंबई कार्यालयात माझे कक्षामध्ये हजर झाले. त्यादरम्यान मी दोन्ही पंच व सापळा पथकास देखिल माझे कक्षामध्ये बोलाविले.

दिनांक ०५/१०/२०२६ रोजी तक्रारदार लाप्रवि कार्यालयात त्यांची मुलगी तृप्ती हिचे सोबत १२.०० वा. आले. त्यानंतर मी सपोआ नावडकर, पंच आणि सापळा पथकास, लोकसेवकाने तक्रारदार यांना भेटण्याकरीता बोरीवली पोलीस ठाणेस बोलाविले असल्याचे सांगितले. आज रोजी तक्रारदार यांना लोकसेवकाने मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये १,३०,०००/— हि घेवून भेटण्याकरीता पाठवायचे असून त्यादरम्यान सापळा कारवाई करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, तक्रारदार, त्यांची मुलगी तृप्ती, सपोआ नावडकर, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनांनी लाप्रवि कार्यालयातून कारवाईकरीता रवाना झालो. आम्ही सर्व बोरीवली (प) येथील मोक्ष प्लाझा शॉपिंग सेंन्टरच्या पार्कींगमध्ये पोह रावराणे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य शासकीय वाहनामध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले.

मी तक्रारदार यांचेकडे लोकसेवकास देण्यात येणाऱ्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडे सध्या केवळ रूपये २५,०००/— असल्याचे सांगून सदरची रक्कम माझेकडे दिली. सदर रोख रक्कमेची मी पाहणी केली असता, त्यामध्ये रूपये ५००/— दराच्या ५० भारतीय चलनी नोटा मिळून आल्या. त्यानंतर मी सापळा पथकाच्या मार्फतीने सोबत आणलेल्या रूपये १,०५,०००/— रक्कमेच्या खोटया खेळण्यातील नोटांचा वापर करण्यात येणार असल्याचे तक्रारदार, पंच व सापळा पथकास सांगितले. माझे सूचनेप्रमाणे रूपये २५,०००/— च्या भारतीय चलनी नोटांचा फोटो सापळा पथकातील अंमलदार श्री परब यांनी त्यांचे मोबाईलमध्ये काढला व माझे सूचनेप्रमाणे पंचासमक्ष पोलीस वाहन चालक श्री फटांगरे यांनी रूपये २५,०००/— (रूपये ५००/— दराच्या ५० भारतीय चलनी नोटा) व रूपये १,०५,०००/— रक्कमेच्या खोटया खेळण्यातील नोटा एकत्रित करून त्यास ॲन्थ्रासिन पावडर लावली व सदरची लाचेची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये ठेवून सदर पाकीटास देखिल श्री फटांगरे यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे ॲन्थ्रासिन पावडर लावलेले खाकी रंगाचे पाकीट श्री फटांगरे यांनी तक्रारदार यांनी परीधान केलेल्या भगव्या सदऱ्याच्या उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर मी व सपोआ नावडकर यांनी तक्रारदार, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे स्वत:च्या तोंडावरून डावा हात वारंवार फिरवून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत इशारा करण्यास सांगितले.

ठरल्याप्रमाणे सापळा पथकातील काही अंमलदार व पंच क्र. ०२ श्री आकाडे हे बोरीवली पोलीस ठाणेच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. त्यानंतर मी १६.२५ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या भगव्या रंगाच्या सदऱ्याच्या आतील बाजुस लावून तक्रारदार यांना पंच श्री थोरवे यांचेसह लोकसेवकास भेटण्यासाठी ऑटो रिक्षाने बोरीवली पोलीस ठाणे येथे पाठविले. त्यांचे मागोमाग मी, सपोआ नावडकर व उर्वरीत पथक देखिल ऑटो रिक्षाने बोरीवली पोलीस ठाणेजवळ आलो. तेव्हा तक्रारदार व पंच श्री थोरवे हे बोरीवली पोलीस ठाणेमध्ये गेले व मी आणि सपोआ नावडकर असे सापळा पथकासह पोलीस ठाणेच्या बाहेर थांबून राहीलो.

पोलीस ठाण्यात लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे हे उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेवकास संपर्क केला असता, लोकसेवकाने ते कामानिम्मीत बाहेर गेले असून ते काही वेळातच पोलीस ठाणेमधील रूम नंबर १० मध्ये येत असल्याचे कळविले. काही वेळातच लोकसेवक हे रूम नंबर १० मध्ये आले तेव्हा तक्रारदार हे पंच श्री थोरवे यांचेसह आत गेले. तेथे तक्रारदार व लोकसेवकामध्ये

समक्ष,

(अमोल आंबवणे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

चर्चा झाली. त्यादरम्यान लोकसेवकाने पंच श्री थोरवे यांचेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी ते केअर टेकर असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवकाने डोळयाच्या इशाऱ्याने तक्रारदारास पंच श्री थोरवे यांना बाहेर थांबविण्याचा इशारा केला म्हणून तक्रारदार यांनी पंच श्री थोरवे यांना रूमच्या बाहेर थांबण्यास सांगितले. पंच बाहेर गेल्यानंतर तक्रारदार व लोकसेवकामध्ये पुन्हा चर्चा झाली. चर्चे दरम्यान लोकसेकाने तक्रारदार यांचा जबाब घेण्यास सुरूवात केली. काही वेळाने लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे हे तक्रारदार यांना १० नंबर रूमच्या बाहेर घेवून बाजूस असलेल्या रूम नंबर १३ मध्ये घेवून गेले. तेथे लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे लाचेच्या रक्कमेची हाताच्या इशाऱ्याने मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे भगव्या सदऱ्याच्या उजव्या खिशातील रूपये १,३०,०००/- इतक्या लाचेची रक्कम ठेवलेले खाकी रंगाचे पाकीट बाहेर काढून लोकसेवक यांचे समोर धरले. तेव्हा लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे यांनी सदरचे लाचेच्या रक्कमेची खाकी रंगाचे पाकीट उजव्या हाताने स्विकारून ते बाजूस असलेल्या बॉक्समध्ये टाकले. त्यावेळी तक्रारदार यांनी बाहेर येवून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारलेली असल्याबाबत सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे डावा हात वारंवार तोंडावर फिरवून पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावर तात्काळ बाहेर थांबलेल्या सापळा पथकातील पोलीस अंमलदार श्री जगदीश तेली व श्री मनोज परब यांनी लोकसेवक यांना १७.४२ वा. ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या लोकसेवकास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता – ज्ञानेश्वर मोहन परांडे, वय ३१ वर्षे, पद – पोलीस उप निरीक्षक, नेमणूक – बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई राहि – बी १ विंग, रूम नंबर १८, पोलीस अधिकारी वसाहत, बोरीवली, मुंबई, मुळ गाव – मु.पो. वडगाव दर्या, तालुका – पारनेर, जिल्हा – अहिल्यानगर असे सांगितले. सपोआ नावडकर यांनी लोकसेवक श्री परांडे यांना लाचेच्या रक्कमेच्या खाकी रंगाच्या पाकीटाबाबत विचारणा केली असता, त्यांनी बाजुच्या बॉक्समध्ये ठेवलेले असल्याचे सांगितले. त्यावर पंचासमक्ष सदरचे खाकी रंगाचे पाकीट हस्तगत करून त्यामधील रक्कम बाहेर काढली. नमूदच्या रक्कमेच्या भारतीय चलनी नोटांची पाहणी केली असता, सापळा पुर्व कारवाई मध्ये फोटो काढलेल्या रूपये २५,०००/- च्या नोटांचे नंबर व ताब्यात घेतलेल्या लाचेची रक्कमेच्या नोटांमधील भारतीय चलनी नोटांचे नंबर हे सारखेच असल्याचे दिसून आले. तसेच हस्तगत केलेल्या खाकी रंगाच्या पाकीटाची व लाचेच्या रक्कमेची अल्ट्राव्हायलेट व्हायलेटच्या बॅटरीखाली तपासणी केली असता, नमूच्या लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रोसिन पावडर लावलेली असल्याचे दिसून त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर बोरीवली पोलीस ठाणेस यशस्वी सापळा कारवाईची उर्वरीत कार्यवाही पुर्ण करून उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही ताब्यात घेतलेल्या लोकसेवक श्री परांडे यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक ३०/०९/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे, पद – पोलीस उप निरीक्षक, नेमणूक – बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई यांनी त्यांच्याकडे तपासाधीन असलेल्या बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई गुरक्र. ११८४/२०२६ मध्ये तक्रारदार व त्यांच्या दोन बहिणींना अटक न करण्यासाठी आणि गुन्हयाच्या तपासात सहकार्य करण्याकरीता स्वत:साठी अनुचित फायदा व्हावा म्हणून तक्रारदारांकडे रूपये १,५०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये १,३०,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दिनांक ०५/१०/२०२६ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री ज्ञानेश्वर परांडे यांना मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये १,३०,०००/- स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेतले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(अमोल आंबवणे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

…/ फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ………… तात्काळ

…for delay in reporting by the complainant/informant ………………………………

…गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ………………………… -

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) -

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ………… -

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील नमूद ता. वेळी व ठिकाणी कॉलम 7 मधील नमूद आरोपी लोकसेवक याने त्याच्याकडे तपासाधीन असलेल्या गुन्हा (बोरीवली पो. ठाणे गुरक्र. 1184/26) यामध्ये तक्रारदार व त्यांच्या दोन बहीणी यांना अटक न करण्यासाठी व तपासात सहकार्य करण्यासाठी म्हणून स्वतःसाठी अनुचित फायदा होणेसाठी तक्रारदार यांच्याकडे रु. 1,50,000/- लाच रक्कम मागणी केली व तडजोडअंती रु. 1,30,000/- स्विकारण्याचे मान्य केले व त्याप्रमाणे लाच रक्कम रु. 1,30,000/- स्विकारताना रंगेहाथ मिळून आले म्हणून लाप्रवि मुंबई गु.र.क्र. 30/2026 कलम 7 भ्र.प्र. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सहाय्यक पोलीस आयुक्त, शुभदा मोरे लाप्रवि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

…………………………………………………………

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ………………… जिल्हा ………… राज्य ………

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ………… Rank ………… No. ………… to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ……………………………………

(3) Transferred to P. S. ……………………
District ……………………… on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अमोल अंबवणे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई
Posting

Code No. of I. O. ………………………

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 06/01/2026
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report